RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ८४] सोमवार जुलै ५, २०२१/आषाढ १४, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १९९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जुलै २०२१

### अधिसूचना

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४.**

क्रमांक सासवि २०२१/प्र.क्र.११८/कार्या-१६.—श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (२००४ चा महा. १४) याचे कलम ८ चा खंड (ख), कलम १३ चे पोट-कलम (२) आणि कलम २५ चे पोट-कलमे (१) व (२) आणि पोट-कलम (३) चे परंतुक यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यानंतर आणि उक्त कलम २५ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीशिवाय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ( व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने ) नियम, २०१३ यात सुधारणा करण्यासाठी, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ( व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने ) (सुधारणा) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ( व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने ) नियम, २०१३ ( यात, यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा केला आहे ) याच्या नियम ५ मधील, खंड (ज) वगळण्यात येईल.

३. मुख्य अधिनियमाच्या अनुसूचीतील,—

(क) अनुक्रमांक १ समोरील नोंदीमध्ये स्तंभ (३) मधील "दहा वर्षांकरिता" या मजकुराऐवजी "पाच वर्षांकरिता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) अनुक्रमांक २ समोरील नोंदीमध्ये—

(एक) व्यवसाय व्यवस्थापन इ., या प्रवर्गासमोरील स्तंभ (३) मध्ये "दहा वर्षांचा" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे त्या त्या ठिकाणी "पाच वर्षांचा" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(दोन) लोक प्रशासन या प्रवर्गासमोरील स्तंभ (३) मधील "दहा वर्षांचा" या मजकुराऐवजी "पाच वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ग) अनुक्रमांक ३ समोरील नोंदीमध्ये,—

(एक) अभियांत्रिकी या प्रवर्गासमोरील स्तंभ (३) मधील "मान्यताप्राप्त विद्यापीठाची" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "धारण केलेली असावी" या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल:-

"मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकीमधील पदवी (बी.ई.) किंवा पदविका आणि अभियांत्रिकी उपक्रमांमधील किमान पाच वर्षांचा अनुभव धारण केलेली असावी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) वास्तुशास्त्र या प्रवर्गासमोरील स्तंभ (३) मधील "वास्तुशास्त्रामधील पदवी (बी.आर्क.) आणि किमान दहा वर्षांचा व्यवसाय केलेली असावी" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल,-

"मान्यताप्राप्त विद्यापीठाची वास्तुशास्त्रामधील पदवी (बी.आर्क.) किंवा पदविका आणि वास्तुशास्त्र उपक्रमांमधील किमान पाच वर्षांचा अनुभव धारण केलेली असावी" ;

(घ) अनुक्रमांक ४ समोरील नोंदीमध्ये, स्तंभ (३) मधील "दहा वर्षांचा" या मजकुराऐवजी "पाच वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ङ) अनुक्रमांक ५ समोरील नोंदीमध्ये, स्तंभ (३) मधील "दहा वर्षांचा" या मजकूराऐवजी "पाच वर्षांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय आनंदराव देशमुख,**
शासनाचे सचिव.